
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय सोळावा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय सोळावा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नमः ||

## अध्याय सोळावा

# दैवासुरसंपद्विभागयोग

प्राप्त होता आत्मज्ञानास । नाहीसा झाला विश्वाचा भास । म्हणून श्रीगुरूस । वंदितो मी ||१||
अज्ञानरूप अंधार घालवून । ज्ञान अज्ञानासह जिरवून । केले आत्मप्रबोधन । दयाळूपणे ||२||
होता ते आत्मज्ञान । जीवभाव जात असे विरून । जसे सूर्याच्या कारण । उजाडते अर्जुना ||३||
प्राप्त होता ज्ञान । वासना त्या संपून । मुक्त होई बा भ्रमातून । चैतन्य अर्जुना ||४||
मनाच्याच कारण । जीव गेला होता भ्रमून । त्या मनास येता मरण । ज्ञान झाले ||५||
स्वरूपाच्या वियोगानं । जीव गेला होता गोंधळून । होता स्वरूपाचे ज्ञान । प्रकटे शांति ||६||
मन ते विरता । अनुभवा येते ब्रह्ममयता । जाणता मन इंद्रियांची व्यर्थता । ज्ञान होते ||७||
आत्मज्ञानी गुरू भेटता । होते मनाची बा सांगता । मगच ती स्वरूपता । अनुभवा येते ||८||
अज्ञानाच्या कारण । भासते विश्वाचे प्रकटन । जैसे भासवती सूर्यकिरण । मृगजळ अर्जुना ||९||
होता ते आत्मज्ञान । जीवभावच जातो विरून । ऐसे दु:खाचे मूळ कारण । संपते अर्जुना ||१०||
मूळ माया विरता । विश्वाचा आभास लोपता । सर्वत्र मग ब्रह्ममयता । भरली आहे ||११||
अद्वैत बोधाच्या कारण । सच्चिदानंदा जाणून । सुखदु:खाचं संपणं । अनुभवा येते ||१२||
ऐसे सद्‌गुरूच्या कारण । होते अर्जुना ज्ञान । स्वप्न सुषुप्तीत जागणं । सूत्र आहे ||१३||
जैसे सूर्य तो उगवता । अनुभवा येते प्रकाशता । तैसे आत्मज्ञान होता । संपती इच्छा ||१४||
ज्ञान अज्ञान मावळवून । जीवभाव तो संपवून । काढतसे भवचक्रातून । सद्‌गुरू माझा ||१५||
द्वैत ते संपता । प्रकटते अद्वैतता । सद्‌गुरूवचन आकळता । ज्ञान होते ||१६||
होता सद्‌गुरूंचे स्मरण । वाचाच जाते विरून । सद्‌गुरूंची स्तुति शब्दानं । होत नाही ||१७||
देवाची स्तुती करणे । मग देवच होणे लागणे । यालाच गा ज्ञान म्हणे । सद्‌गुरू माझा ||१८||
चारी वाचा मौन होता । अनुभवाचे द्वैत संपता । मन संपूर्ण लया जाता । प्रकटते ज्ञान ||१९||
वैखरी मध्यमा पश्यंती विरणे । तेव्हाच तुर्येचे ज्ञान होणे । मग तुर्याही लया जाणे । मुक्ती अर्जुना ||२०||
त्या सद्‌गुरूची मी सेवकपणे । शब्दांनी बा सेवा करणे । ते अज्ञानच मी जाणे । अंतरंगी अर्जुना ||२१||
अमृताचा तो सागर । दरिद्र्यास बा भेटल्यावर । तो करे जसा पाहुणचार । भाकरीचा शिळ्या ||२२||
त्या भाकरीचा आदर करून । त्याचा आनंद वाढवणं । तसं माझं ते बोलणं । ऐकावे तुम्ही ||२३||
जसं शुद्ध ते बोलणं । बाळास ठाऊक नसणं । तरी मातेनं संतोषणं । बोलांनी त्याच्या ||२४||
गाव नाल्याचे पाणी ते । गंगेस येऊन मिळते । गंगा का कधी करते । द्वेष त्याचा ||२५||
जैसे त्या भगवंताने । भृगुची लाथ खाणे । आणि पदचिन्ह ते मिरवणे । गुरुत्वाकारण ||२६||
का अंधारलेले अंबर । येता सूर्यासमोर । सूर्य का म्हणे सर । बाजूला तू ||२७||
मी अल्पबुद्धीच्या कारण । सूर्यासी तुलना करणं । ते नाही का केले सहन । श्रीगुरूंनी माझ्या ||२८||
जसे ध्यानात ब्रह्म अनुभवून । वेदांनी केले वर्णन । तैसे सद्‌गुरू करा सहन । शब्द माझे ||२९||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

चटावलो करण्या गुणवर्णन । पण क्षमा मला करून । करावी हौस माझी पूर्ण । सद्‌गुरू तुम्ही ॥३०॥
करण्या गीतेचे वर्णन । मला बळ चढलं दुपटीनं । म्हणूनच ब्रह्माचं गुणगान । प्रकटलं मुखी ॥३१॥
अनेक मी कल्प । केले सत्यवादाचे तप । म्हणून ज्ञानेश्वरी अप्रूप । साकारली येथे ॥३२॥
पुण्य केले असाधारण । म्हणून शक्य तुझे वर्णन । केलेस मजला उत्तीर्ण । आज देवा ॥३३॥
फसून जीवभावाच्या बेडीत । होतो अडकलो जन्ममरण फेऱ्यात ।पण शिकवून मनाचा अंत । सोडवले तू ॥३४॥
प्रसिद्ध जी गीता म्हणून । तिने केले जीवभावाचे निर्दालन । म्हणून तुझे ते वर्णन । प्रकटले मनी ॥३५॥
जयाच्या बा घरात । महालक्ष्मी येऊन असे राहत । तयासी का कोणी म्हणतं । निर्धन अर्जुना ॥३६॥
अंधाराच्या जर घरात । सूर्य आला अवचित । मग अंधारच असे बनत । प्रकाश अर्जुना ॥३७॥
पाहता देवाचे अनंतपण । विश्व परमाणूहूनही लहान । पण भावाची बरोबरी करणं । अशक्य त्याला ॥३८॥
गीतेवर करणे निरूपण । ते आकाशपुष्पाचा वास घेणं । पण माझी तीही हौस पूर्ण । केली तुम्ही ॥३९॥
सद्‌गुरुच्याच कृपेनं । मी करतसे गीतेचे निरूपण । गीतेचा खोल अर्थ उलगडणं । दया तुमची ॥४०॥
मागील पंधराव्या अध्यायात । अर्जुनास सांगितला शास्त्रसिद्धांत । वृक्षाचे उदाहरण देत । भगवंताने ॥४१॥
जसे त्या हुशार वैद्यानं । करावे रोगाचे निदान । तैसे वृक्षाचे रुपक घेऊन । सांगितले ज्ञान ॥४२॥
अव्यक्त गुह्य जो अक्षर । दाविला पुरुषाचा प्रकार । उपाधीच जी साकार । चैतन्याठायी ॥४३॥
नंतर सांगितला उत्तम पुरुष । शब्दाचे करून आमिष । वर्णिले आत्मतत्त्व नि:शेष । अर्जुनाठायी ॥४४॥
प्राप्त होण्या आत्मज्ञान । केवळ ज्ञानच आहे साधन । सांगितले स्पष्ट करून । भगवंताने अर्जुना ॥४५॥
म्हणून आता अर्जुना । शिल्लक काहीच नाही निरूपणा । संपूर्ण त्या ज्ञाना । ऐकलेस तू ॥४६॥
जे होते बा आत्मज्ञानी । ते गेले मग संतोषुनी । मुमुक्षु गेले बुडूनी । चिंतनात ॥४७॥
ऐसे जे भक्तजन । भेटती मज ज्ञानरुपानं । तयालाच माझी जाण । येते अर्जुना ॥४८॥
ऐसे केले पहा वर्णन । पंधराव्यात त्या भगवंतानं । ज्ञानाची थोरवी समजावून । सांगितली येथे ॥४९॥
द्रष्टा दृश्याची अभिन्नता । अर्जुना अंतरी उमजता । विश्वाची भासमानता । लयासी जाते ॥५०॥
अर्जुना एवढा सामर्थ्यवान । उपाय नसे अन्य । केवळ सम्यक ज्ञानानं । प्रकटन ब्रह्माचे ॥५१॥
ऐसे आत्मजिज्ञासू जे होते । ते संतोषले चित्ते । आदरे तयानी ज्ञानाते । ओवाळीले जीवे ॥५२॥
जे मनाला आवडतं । तेच करावं वाटतं । त्यालाच बा प्रेम म्हणतात । अर्जुना माझ्या ॥५३॥
म्हणून जिज्ञासूला जोपर्यंत । ज्ञान अर्जुना नाही होत । तोपर्यंत ज्ञानाचीच बात । स्फुरते मनी ॥५४॥
हे बा सम्यक ज्ञान । कैसे होतसे स्वाधीन । झालीया वृद्धिजतन । चिंता त्यांची ॥५५॥
ज्ञान का होत नाही प्राप्त । उपजल्या का ते लया जातं । उपाधि काय ज्ञानाच्या मार्गात । जाणावे आधी ॥५६॥
उपाधि जाणताच विरते । मग वाट मोकळी होते । ऐसे ज्ञान मनी प्रकटते । तहान असता ॥५७॥
ज्ञानी जन तुम्ही समस्त । आला धरून ज्ञान इच्छा चित्तात । ती पुरवण्या भगवंत । बोलेल आता ॥५८॥
जे शांति मनी प्रकटवून । वाढवते जे ज्ञान । ऐशा गुणांचे वर्णन । ऐकाल तुम्ही ॥५९॥
आणि वासनेच्या कारण । जे रागद्वेषाचं वाढणं । ते आसुरी बा गुण । सांगतील भगवंत ॥६०॥
सुर असुर गुणाकारण । चांगले वाईट कर्म निपजणं । नवव्यात हे निरूपण । येणार होते ॥६१॥
पण निरूपणाच्या ओघात । दुसराच विषय आला पुढ्यात । म्हणून पुन्हा आता भगवंत । सांगतील तो ॥६२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

त्या गुणांचे निरूपण । करतील आता भगवान । सोळाव्यात तयांचे वर्णन । आहे अर्जुना ॥६३॥
पुरे करतो ही प्रस्तावना । परंतु ज्ञानाच्या त्या प्रकटना । जाणणे दोन्ही गुणा । अनिवार्य की ॥६४॥
जी मार्गदर्शक मुमुक्षूंना । नि संपवी त्या अज्ञाना । त्या दैवी गुणांना । ऐकावे आधी ॥६५॥
ज्ञानास पोषक जे गुण । अर्जुना तयांना वाढवणं । ते दैवी संपत्ती म्हणून । सांगितले आहे ॥६६॥
दैवाचे कारणे सुखप्रकटन । लाभते जी दैवयोगानं । तिलाच दैवी संपत्ती म्हणून । ओळखती सारे ॥६७॥
सर्व त्या दैवी गुणात । जो मुख्य असे असत । तया अभय बा म्हणतात । अर्जुना माझ्या ॥६८॥
जो पुरात उडी नाही घालत । तया बुडण्याचं भय नसतं । जो पथ्य असे पाळतं । तया रोग कैचा ॥६९॥
तैसे कर्म अकर्म जाणून । कर्म संपूर्ण विरू देणं । तेथे अभयाचं प्रकटन । आहे अर्जुना ॥७०॥
कर्म संपूर्ण विरता । अंतरी प्रकटते ब्रह्ममयता । मग भयाची ती वार्ता । उरेच ना ॥७१॥
पाण्यात एकरूप होऊन । मिठानेच पाणी होणं । तैसे आपणच ब्रह्म होऊन । नाशावे भय ॥७२॥
केवळ सम्यक ज्ञानानं । होते अभयाचे प्रकटन । अभय आणि ज्ञान । भिन्न नाही ॥७३॥
आता सत्त्वशुद्धि जे म्हणिजे । ते ऐशा चिन्ही जाणिजे । जी जळे ना विझे । राखुंडी जैसी ॥७४॥
जितकी अमावास्या मागे जाते । तितकीच पौर्णिमा पुढे राहते । अशा मध्यस्थितीते । चंद्र जैसा ॥७५॥
पावसाळा तो गेला । आणि उन्हाळा नाही आला । ऐशा मध्यस्थितीला । गंगा जैसी ॥७६॥
सोडून संकल्प विकल्पाची ओढ । सांडणे रज तमाची कावड । तुटणे अहंकाराचे झाड । कल्याणकारी ॥७७॥
होता सुखदु:खाचं प्रकटन । मन स्थिर ठेवून । अनुभवाचे करता अवलोकन । शुद्धी अर्जुना ॥७८॥
पती परगावास जाता । जशी पतिव्रतेची उदासीनता । तैसी मनाची समता । शुद्धता देई ॥७९॥
तैसे स्वरूपाच्या तहानेकारणे । बुद्धि ती अनन्य होणे । तिलाच सत्त्वशुद्धि म्हणे । भगवंत अर्जुना ॥८०॥
आत्मलाभाच्या कारण । ज्ञान वा अष्टांगयोग अभ्यासणं । ते करते बा कल्याण । जीवाचे अर्जुना ॥८१॥
तेथे सगळ्या चित्तवृत्ती । त्यागणे समत्वाचे रीती । देता वासनांची पूर्णाहुती । ज्ञान होते ॥८२॥
कुलवंताने कन्या देणे कुलवंतासी । वा लक्ष्मी स्थिरावे मुकुंदापाशी । तैसे एकरुपता ब्रह्मासी । ज्ञान आहे ॥८३॥
ऐसे सर्व विकल्प सोडून । योग ज्ञान अभ्यासणं । यालाच तिसरा गुण । म्हणे कृष्णनाथ ॥८४॥
वैरी पाहून संकटात । जो मदत असे करत । सहाय्य करणे दु:खात । चांगले अर्जुना ॥८५॥
वाटसरूला जसं झाडानं । पान-फूल फळे देणं । तैसे धन आणि मनानं । करावी सेवा ॥८६॥
दमलेला पीडलेला पाहून । तया धनधान्य देणं । इतरांच्या उपयोगी पडणं । दान अर्जुना ॥८७॥
करता अहंकाराचे दान । प्रकटते मोक्षाचे निधान । आता ऐक ते चिन्ह । दमाचे तू ॥८८॥
तलवार कापते दुष्मनाला । तैसे तोडणे विषयापासून इंद्रियाला । म्हणतात बा त्याला । दम अर्जुना ॥८९॥
विषयांना दूर करून । इंद्रियांना आवरणं । तयासीच प्रत्याहार म्हणून । सांगतसे भगवंत ॥९०॥
आत होती चित्तात । ती प्रवृत्ती संपून असे जात । मग दाही द्वारी असे तेवत । अग्नी वैराग्याचा ॥९१॥
अखंड श्वासोच्छ्वासाप्रमाणे । खडतर व्रते करणे । तयाने सजग साक्षी राहणे । रात्रंदिन ॥९२॥
जयाला दम म्हणतात । तो सांगितला थोडक्यात । आता यज्ञाचा तो अर्थ । ऐक तू अर्जुना ॥९३॥
शूद्र स्त्रिया आणि ब्राह्मण । यांनी अधिकाराप्रमाणे करणे वर्तन । तयासीच यज्ञ । नाव आहे ॥९४॥
आपल्या समजेप्रमाणे । देवधर्म आचरणे । तेच यज्ञाचे करणे । आहे अर्जुना ॥९५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

षट्कर्म करे ब्राह्मण । नि शूद्राने तया नमस्कारणं । मग दोघांचाही यज्ञ । पूर्ण झाला ॥९६॥
ऐसे अधिकारानुसार । करणे तो आचार । मात्र फलप्राप्तीचा विचार । सोडून द्यावा ॥९७॥
कर्तेपणाची भावना । अर्जुना तेथे उपजेच ना । मगच त्या यज्ञा । अर्थ आहे ॥९८॥
ऐसा यज्ञ करून । करावे स्वत:चे कल्याण । मोक्षमार्गाचा मित्र जाण । यज्ञास तू ॥९९॥
घेण्या ते उत्पन्न । शेतात जैसे बी पेरणं । तैसे यज्ञ आचरण । कल्याणदायी ॥१००॥
पहाणे जर गुप्तधन । मग पडे दिवा लावणं । तैसे यज्ञ करणं । फलदायी ॥१०१॥
होण्या आपले मुखदर्शन । ठेवावा आरसा स्वच्छ करून । तैसे हे सांगणं । आहे अर्जुना ॥१०२॥
वेदातील तत्त्व ते ईश्वर । होण्या अर्जुना गोचर । श्रुतीचा अभ्यास निरंतर । करावा अर्जुना ॥२०३॥
शुद्ध मना ब्रह्मसूत्र । अशुद्ध मना नाममंत्र । आकळण्या ते परत्र । मार्ग हाचि ॥१०४॥
आता काय ते दान । सांगतील पहा भगवान । लक्ष ते देऊन । ऐकावे अर्जुना ॥१०५॥
जैसे फळ ते देऊन । झाड जाते सुकून । तैसे जीवभाव त्यागणं । दान अर्जुना ॥१०६॥
जैसे अग्नीत स्वत: जळून । जाते सोने शुद्ध होऊन । तैसे अहंभाव सोडून । मुक्त व्हावे ॥१०७॥
होण्या स्वरूपाचे ज्ञान । सांडणे शरीर इंद्रिये आणि मन । तेचि अर्जुना जाण । तप आहे ॥१०८॥
जसं त्या राजहंसानं । आपली चोच वापरून । दूधपाणी वेगळ करणं । तैसे अर्जुना ॥१०९॥
अज्ञानाच्या कारण । आत्मतत्त्व नि शरीर मनाची मिसळण । दोहोस अलग करून जाणणं । तप अर्जुना ॥११०॥
मन बुद्धि इंद्रियांच्या कारण । न प्रकटते आत्मज्ञान । मन बुद्धि इंद्रिये त्यागणं । सूत्र आहे ॥१११॥
आत्मतत्त्वाची तहान । जयाच्या कारणे बळावणं । ऐसे चिंतन मनन । तप अर्जुना ॥११२॥
सर्वत्र चैतन्य जाणून । अंतरी करुणा प्रकटणं । सर्वांभूती विवेकाने वागणं । आर्जव ते ॥११३॥
शरीर वाचा मनाने । जगासी सुख ते देणे । तीच अहिंसा म्हणे । भगवंत येथे ॥११४॥
मोगऱ्याची कळी अणिदार । पण नाहीच ती टोचणार । तैसा मृदु व्यवहार । सत्याठायी ॥११५॥
रोग जे फेडते । तरी कडू न लागते । असे कधी का असते । औषध अर्जुना ॥११६॥
जेधवा बुबुळावर शिडकले जाते । पाणी मऊ अनुभवा येते । पण खडकासही चिरते । तैसे अर्जुना ॥११७॥
जाण्या भ्रमाच्या पार । सत्य लोखंडाहूनही कणखर । पण कानासी मधुर । वाटते ते ॥११८॥
सत्य ते ऐकून । कानासही लागते तहान । सत्याच्याच त्या कारण । प्रकटते ब्रह्म ॥११९॥
यथार्थ ऐसे सांगणे । कोणीच दुखावले न जाणे । तयासीच मी म्हणे । सत्य अर्जुना ॥१२०॥
जसे पारध्याचे गाणे छान । पण हरणाचे ते मरण । त्या अग्नीसी पाचारणं । जळणेच की ॥१२१॥
वाणी कपट्याची मधुर । पण आतून घातकी फार । मग नव्हेच ती सुंदर । तैसी अर्जुना ॥१२२॥
नाही का मातेचा कोप । जसे मऊ सुंदर पुष्प । तैसीच बा अमूप । सत्य वाणी ॥१२३॥
कोणासही न दुखावून । करणे सत्याचे प्रकटन । तेच अर्जुना बोलणं । सत्य आहे ॥१२४॥
पाषाणी पाणी घालता । प्रकटते का कधी अंकुरता । का ताक ते घुसळता । प्रकटते लोणी ॥१२५॥
करता कितीही प्रहार । सापाच्या त्या कातेवर । करते का फडा वर । कात कधी ॥१२६॥
रंभेच्या त्या लावण्याने । शुका काम न उद्भवणे । जैसे भस्मी अग्नी न उठणे । शिंपडताही तूप ॥१२७॥
ज्या शब्दाच्या कारण । बालकालाही क्रोध येणं । तेथे बा शांत राहणं । अक्रोध तो ॥१२८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जीव असे शरीर सोडत । मग नाहीच तो परतत । तैसे कधीच नसे उपजत । क्रोध मनी ॥१२९॥
तयासीच बघ म्हणतात । अर्जुना बा अक्रोधत्व । आहे म्हटला भगवंत । गीतेमाजी ॥१३०॥
त्यागता माती त्याग घटाचा । त्यागता तंतू त्याग वस्त्राचा । त्यागता बीज त्याग वटाचा । होतोच की ॥१३१॥
त्यागता भिंत त्याग चित्राचा । त्यागता निद्रा त्याग स्वप्नाचा ।त्यागता मन त्याग अहंकाराचा ।तैसे की ॥१३२॥
त्यागता जल त्याग तरंगाचा । त्यागता मेघ त्याग पावसाचा । त्यागता धन त्याग भोगाचा । तैसे अर्जुना ॥१३३॥
तैसे त्यागून इंद्रिय मन । सांडणे मिथ्या देहाभिमान । तयालाच त्याग म्हणून । ओळखती ज्ञानी ॥१३४॥
ऐसा जो त्याग । तोच यज्ञाचा भाग । येणे स्वस्वरूपाची जाग । त्याग अर्जुना ॥१३५॥
शांति म्हणती कशाला । अर्जुन विचारता झाला । मग भगवंत काय म्हणाला । ऐका आता ॥१३६॥
दृश्याशी तादात्म्य तुटल्याकारण । द्रष्टा दर्शनासह मावळणं । तेच शांति म्हणून । प्रसिद्ध वेदांती ॥१३७॥
जैसा प्रलय तो होता । सर्वत्र पाण्याचीच सत्ता । मग कशाचाही पत्ता । नुरेच तेथे ॥१३८॥
नदी सागर एक झाले । उगम संगम प्रलयी बुडाले । फक्त पाणीच उरले । पाण्या माजी ॥१३९॥
तैसे ज्ञेय ते संपता । लय पावतो ज्ञाता । केवळ ज्ञान ते उरता । शांति अर्जुना ॥१४०॥
रोगी समोर येता । वैद्या न स्मरते शत्रुता । शत्रुता आणि मित्रता । सम तेव्हा ॥१४१॥
गाय चिखलात रुतलेली पाहून । दुभती की भाकड न पाहणं । आणि जीव कासावीस होणं । तैसे अर्जुना ॥१४२॥
मनुष्य असता बुडत । ब्राह्मण शूद्र नाही कोणी पहात । केवळ असे वाचवत । तयासी अर्जुना ॥१४३॥
रानात त्या चांडाळानं । केली स्त्री वस्त्रहीन । परि तिच्याकडे न पाही सज्जन । वस्त्र नेसवल्यावाचून ॥१४४॥
तैसे अज्ञानाकारण । पूर्वजन्मी वाईट कर्म केल्यानं । अति दु:ख येणं । नशिबी त्यांचे ॥१४५॥
तयांना बल आपले देऊन । दु:खाचा विसर पाडणं । जे घडे करुणेकारण । तयांच्याकडून ॥१४६॥
स्वत:चे दोष ओळखून । स्वत:स न्याहाळणं शिकवून । शुद्धता बा घडवणं । तयांच्या अंतरी ॥१४७॥
पूजा करून ध्यान करणं । शेत पेरून राखणं । संतुष्ट करून आशीष घेणं । अतिथींचा जैसा ॥१४८॥
सूक्ष्म नजरेनं पाहून । गुण आपले तयांना देऊन । तयांचे उणे दूर करणं । तैसे अर्जुना ॥१४९॥
वर्मावर घाव घालणे । अकर्मात अडकवणे । कोणाही नावे ठेवणे । ते दोष अर्जुना ॥१५०॥
जे असतील संकटात । तयांना करणे मदत । हेच तयांच्या स्वभावात । असे अर्जुना ॥१५१॥
उत्तम आणि अधमात । तयांना भेदच नाही दिसत । समबुद्धीच असे वसत । तयांच्या ठायी ॥१५२॥
अगा हेच अपैशूनाचे लक्षण । अर्जुना तू जाण । मोक्षमार्गीचे वाहन । हे मुख्य गा ॥१५३॥
आता दया ती ऐसी । पौर्णिमेच्या चंद्रा जैसी । चांगल्या वाईटाचा तयापाशी । नसे भेद ॥१५४॥
दु:खिताचे दु:ख हरणे । सर्वांवर दया करणे । उत्तम अधम न जाणे । मन त्याचे ॥१५५॥
जसे अर्जुना ते पाणी । स्वत: नाश पावूनी । सोडी गवत तरतरूनी । संपण्याआधी ॥१५६॥
दुसऱ्याचे दु:ख पाहून । तयाने करुणेनं तळमळणं । तयांसाठी सर्वस्व त्यागणं । आवडे त्याला ॥१५७॥
जसे मार्गातले खड्डे ते । नदी भरूनच पुढे जाते । तैसे दु:खितांना देणे सुख ते । कर्तव्य त्याचे ॥१५८॥
जेव्हा पायात घुसतात काटे । दु:ख चेहऱ्यावर उमटे । तैशी दुसऱ्यांची संकटे । पोळती त्याला ॥१५९॥
पायांना थंडावा लागतो । मग डोळ्यातही तो जाणवतो । तसा परसुखाने सुखी होतो । दयावान ॥१६०॥
तहानलेल्यांना सुख देण्या । देवाने निर्मिले पाण्या । तैसे दु:खितांच्या कल्याणा । जिणे याचे ॥१६१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसा पुतळा दयेचा । मी ऋणी जन्मत: त्याचा । जो हात देण्या मदतीचा । तयार सदैव ॥१६२॥
जसे त्या कमळाने । सदैव सूर्याकडे पाहणे । पण तयाचा सुवास न घेणे । सूर्याने जसे ॥१६३॥
जसे त्या वसंतात । वनश्री असे फुलत । पण नसे तिच्यात अडकत । वसंत जैसा ॥१६४॥
महासिद्धिंसकट । जरी लक्ष्मी करी लगट । परि लक्षच नसे देत । विष्णू जैसा ॥१६५॥
जेधवा भोग होता प्राप्त । भोगणे तयाच्या मनात । कधीच नाही येत । विरक्त जैसा ॥१६६॥
कोणत्याही त्या विषयात । वासनाच नसे उरत । तेचि बा अलोलुपत्व । जाण अर्जुना ॥१६७॥
पक्ष्यांना प्रिय मोहोळ । जलाचरा जैसे जळ । पक्ष्याठायी अंतराळ । तैसे अर्जुना ॥१६८॥
त्या बालकाच्या करिता । मातेची ती ममता । जसा वसंताचा स्पर्श होता । सुगंधतो वायू ॥१६९॥
डोळे प्रियतमाच्या भेटी । कासवीची पिलांसाठी दृष्टी । तैसी भूतमात्री रहाटी । तयाची अर्जुना ॥१७०॥
स्पर्शे अतिमृदु । मुखी घेता सुस्वादु । घ्राणासी सुगंधु । कापूर जैसा ॥१७१॥
कापूर योग्य मात्रेत घेणे । मग तो विषम न होणे । तैशा आचरणा मार्दव म्हणे । भगवंत अर्जुना ॥१७२॥
महाभुताहूनही महान । आणि परमाणुहूनही लहान । जैसे ते गगन । आहे अर्जुना ॥१७३॥
ऐसे जगणे ते जीवन । जगाचाच प्राण होऊन । तयासीच बा म्हणणं । मार्दव मी ॥१७४॥
पराभवाच्या त्या कारण । राजास शरम वाटणं । वा गर्विष्ठास अपमान । वाटणे जैसे ॥१७५॥
वेश्येच्या महालापाशी । चुकून जाता संन्यासी । लाज मग जैसी । वाटते तया ॥१७६॥
रणांगणातून ते पळणं । क्षत्रिया न होतसे सहन । आवडे का वैधव्याचे आमंत्रण । पतिव्रते कधी ॥१७७॥
उठता रुपवाना कुष्ठ । तयासी बा प्राण संकट । कुचेष्टेचे गालबोट । आवडे का कोणा ॥१७८॥
शरीर जे हात साडेतीन । तयात बंदीवान होऊन । वारंवार जन्मणं नि मरणं । नावडे तया ॥१७९॥
गर्भाशयात शिरणे । रक्तमूत्रात रहाणे । मांसाचा पुतळा होणे । अज्ञान अर्जुना ॥१८०॥
ऐसे ते देहपणे । नामरुपासी येणे । ते वाटे लाजिरवाणे । तयाला अर्जुना ॥१८१॥
ऐशा अवकळाकारण । शरीराचा कंटाळा येणं । तयासीच बा लाज म्हणणं । आवडे मला ॥१८२॥
कळीची दोरी तुटते । नि कळसूत्री बाहुली थांबते । तैसे याचे कर्म थांबते । ज्ञान होता ॥१८३॥
सूर्य मावळल्यावर । संपतो किरणांचा विस्तार । तसा बंद पडतो इंद्रिय व्यापार । संपता कर्म ॥१८४॥
ऐसे संपता ते मन । दाही इंद्रिये जाती विरून । तयासीच अचापल्य म्हणणं । अर्जुना मी ॥१८५॥
ईश्वराची तहान असणं । मग ज्ञानमार्ग अवलंबून । मन इच्छेस विरू देणं । अनिवार्य अर्जुना ॥१८६॥
आधीच भयंकर ते मरण । त्याहून भयंकर आगीत जळणं । पण पतिव्रतेस पर्वा नसणं । तैसे अर्जुना ॥१८७॥
तैसे आत्मप्राप्तीच्या कारणे ।मनइंद्रियापलीकडे जाणे ।मग मनइंद्रियांची व्यर्थता समजणे। अनिवार्य की ॥१८८॥
मनाचा रागद्वेष न करता । विधीची चाड न धरता । सिद्धींची आशा सांडता । प्रकटते ज्ञान ॥१८९॥
ऐसे ईश्वराकडे निज । धावणे अर्जुना सहज । तयासीच बा तेज । नाव आहे ॥१९०॥
सर्व त्या ज्ञान्यांत । मीच श्रेष्ठ अत्यंत । असा गर्व नसणे मनात । क्षमा अर्जुना ॥१९१॥
मातल्या इंद्रियांचे वेग । जर का प्रकटले जुने रोग । अथवा होणे तो वियोग । प्रियजनांचा ॥१९२॥
ऐसे सारे प्रकार । अर्जुना येता समोर । जो चळेच ना कणभर । अगस्तीप्रमाणे ॥१९३॥
जसा आकाशातला धूर । वारा करतसे दूर । एकाच झुळकेबरोबर । तैसे अर्जुना ॥१९४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होता त्रिविधतापांचं प्रकटन । याने स्थिर ते रहाणं । आणि टाकणे सर्वांना जिरवून । अंतरामाजी ॥१९५॥
ऐसा क्षोभाच्या अवसरी । जो धैर्य अंतरी धरी । तोच धृतीच्या सिंहासनावरी । बैसला अर्जुना ॥१९६॥
सोन्याचा मुलामा देऊन । कलशात गंगामृत भरणं । तैसे सात्त्विक मन । शौच अर्जुना ॥१९७॥
निष्काम कर्म करणे । सदैव विवेकाने वागणे । ही शुचित्वाचीच चिन्हे । असती अर्जुना ॥१९८॥
जैसे प्राणिमात्रांचे पाप शमवीत । तीरावरील झाडांना पोसत । समुद्राकडे असे जात । गंगा जैसी ॥१९९॥
अंधार दूर करत । कमळांना त्या फुलवीत । प्रदक्षिणेस असे निघत । सूर्य जैसा ॥२००॥
तैसे बद्धांना मुक्त करणे । बुडणाऱ्यांना वाचवणे । दु:खिताचे संकट निवारणे । धर्म याचा ॥२०१॥
किंबहुना दिवसरात्र । दुसऱ्यांना मदत करत । आत्महित असे साधत । परोपकारे ॥२०२॥
दुसऱ्यांना त्रास देऊन । आपले हित साधणं । ही कल्पनाही न शिवणं । तयाच्या मना ॥२०३॥
ऐसी ही लक्षणे । जेथे अर्जुना आढळणे । तेथे अद्रोहत्वाचे नांदणे । जाणावे मनी ॥२०४॥
शंकराने धारता जटेत । गंगा जशी असे लाजत । तैसा होत असे लज्जीत । मान मिळता ॥२०५॥
वारंवार मी अर्जुना । सांगतो पुन: पुन्हा । याच अमानित्वाच्या खुणा । जाणाव्यात तू ॥२०६॥
ऐसे हे सव्वीस । जे दैवी गुण खास । ते प्राप्त मोक्षधाऱ्यास । अर्जुना माझ्या ॥२०७॥
बा आत्मज्ञानाकारण । मनी दैवी संपत्तीचे प्रकटन । जशी गंगाच ती येणं । अंगणी अर्जुना ॥२०८॥
माळ सव्वीस फुलांची घेऊन । त्या मुक्तीरुपी नवरीनं । विरक्तास बा घालणं । तैसेच हे ॥२०९॥
होता ते आत्मज्ञान । प्रकटती हे सव्वीस गुण । तेच गीतेचे आकलन । अर्जुना माझ्या ॥२१०॥
गुण जे सव्वीस असती । तीच बा दैवी संपत्ती । होता आत्मज्ञानाची प्राप्ती । प्रकटती ते ॥२११॥
अजून काय करू वर्णन । आपोआप प्रकटती हे गुण । दैवी गुणांची ही खाण । ज्ञानाकारणे ॥२१२॥
ज्या गुणांच्याकारणे । दु:खाचे हे प्रकटणे । तिलाच आसुरी म्हणे । भगवंत अर्जुना ॥२१३॥
त्याज्य वस्तू त्यागणे । मग त्याज्य आधी जाणणे । तेव्हाच बा ते सुटणे । शक्य अर्जुना ॥२१४॥
नरकास जावे लागणे । ज्या पातकांच्या कारणे । तयासच आसुरी म्हणे । भगवंत येथे ॥२१५॥
सर्व विषांची जी एकवट । तयाला म्हणती कालकूट । तैसा आसुरी संपत्तीचा थाट । आहे अर्जुना ॥२१६॥
यासर्व आसुर दोषात । जो मुख्य असे असत । तया बा दंभ म्हणतात । अर्जुना माझ्या ॥२१७॥
माता तीर्थरूप असे असत । पण उघड्यावर दाखवता नग्नावस्थेत । जसे पाप असे लागत । तैसे अर्जुना ॥२१८॥
ज्ञान जे दिले सद्गुरूनं । ते जरी इष्ट असणं । चव्हाट्यावर तयाचा घोष करणं । योग्य नाही ॥२१९॥
महापुरात असता बुडत । जी नाव असे बा वाचवत । तीच असे बा बुडवत । डोक्यावर घेता ॥२२०॥
जीविताचा आधार म्हणून । प्रसिद्ध आहे अन्न । पण करता अति सेवन । अपथ्यच ते ॥२२१॥
जर एखाद्या ज्ञान्यानं । केली ज्ञानाची घोषणा दिमाखानं । मग ज्ञानच दोषाचं साधन । झाले अर्जुना ॥२२२॥
आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन । करणे चौरस्त्यावर आपणहून । तोच बा दंभ म्हणून । जाण अर्जुना ॥२२३॥
जैसे मूर्खाचे ते वागणे । किंचित घडले आकळणे । मग सर्वांना नावे ठेवणे । दर्प अर्जुना ॥२२४॥
माजेल स्वाराचा चढेल घोडा । समजे ऐरावताही थोडा । जसा कुंपणावरचा सरडा । दर्प अर्जुना ॥२२५॥
जसं त्या माशानं । डबक्यात बा राहून । सागरा क्षुल्लक समजणं । तैसे अर्जुना ॥२२६॥
स्त्रिया विद्या आणि धनाकारण । बहुमानाने जाई माजून । जैसे खाऊन ते परान्न । माजला भिकारी ॥२२७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ढगाची सावली पाहून । टाकणं आपलं घर मोडून । वा पाण्याची टाकी तोडणं । पाहता मृगजळ ॥२२८॥
अर्जुना बा तैसे । माजणे गुण संपत्तीचे मिषे । तयासीच दर्प ऐसे । नाव अर्जुना ॥२२९॥
जगाची श्रद्धा वेदांवर । म्हणून पूजती ते ईश्वर । वेदात ज्ञान अपार । आहे अर्जुना ॥२३०॥
जीवाच्या आवडीकारण । न आवडे जीवा मरण । म्हणून तयाने स्तुती करणं । ईश्वराची अर्जुना ॥२३१॥
ऐसी भक्ती पाहून । तया मत्सर बा वाटणं । मग द्वेष तो प्रकटणं । ईश्वराप्रति ॥२३२॥
म्हणे ईश्वरा मी संपवीन । वेदा विष चारीन । तयांची सत्ता संपवणं । विचार त्याचा ॥२३३॥
असे काजव्याठायी फार । सूर्याचा बा मत्सर । जसे टिटवीचे ते वैर । सागरासी अर्जुना ॥२३४॥
तैसे गर्वाच्याकारण । न करे ईश्वराचे नाव सहन । तयाने बापा वैरी समजणं । संपत्तीसाठी ॥२३५॥
ऐसा अभिमान होऊन । तयानं माजून बा जाणं । ते नरकाचेच आरक्षण । अर्जुना माझ्या ॥२३६॥
दुसऱ्याचे सुख पाहून । तो क्रोधाग्नीत जातसे जळून । मत्सर सर्वांचा करणं । स्वभाव त्याचा ॥२३७॥
तप्त तेलात पाणी पडणे । मग आग ती उसळणे । जसे कोल्ह्याचे ते विव्हळणे । दिसता चंद्र ॥२३८॥
जगतास जो बा उजळे । तया देखोनी होती आंधळे । जैसे घुबडाचे ते डोळे । तैसे अर्जुना ॥२३९॥
बा होता ती प्रभात । चोरांना दुःख असे वाटत । जसे दूध विष बनतं । सापाच्या पोटात ॥२४०॥
समुद्राच्या त्या पाण्याने । वडवाग्नी अधिकच भडकणे । आणि मग शांतच न होणे । काही केल्या ॥२४१॥
तैसी दुसऱ्यांची ऐश्वर्ये पाहून । याने रागाने चरफडणं । तयासीच क्रोध म्हणणं । भगवंताने अर्जुना ॥२४२॥
तयाचे मन सर्पाचे वारूळ । डोळे बाणा जैसे काळ । बोलणे निखाऱ्यातला जाळ । तैसे अर्जुना ॥२४३॥
त्यानं जे काही करणं । ते त्या करवतीच्या समान । सर्वांना दुःख देणं । स्वभाव त्याचा ॥२४४॥
तो माणुसकीस काळिमा जाण । ऐसे अधम जयाचं वागणं । आता सांगतो मी खूण । अज्ञानाची ॥२४५॥
थंड आणि वा उष्ण । याची दगडा नसे जाण । फरक जैसा जन्मांधा न कळणं । दिवसरात्रीचा ॥२४६॥
आग उठता पोटात । भूक खाद्याखाद्य नसे पहात । जैसा परीसा नसे भेद । सोनेलोखंडात ॥२४७॥
जसे बुडूनही नाना पदार्थात । पळी चव नसे जाणत । तसे तया चांगल्या वाईटात । फरक नाही ॥२४८॥
मार्गामार्गाची ती निवड । वाऱ्यास नसे बा सवड । तशी कृत्याकृत्याची चाड । नाही तेथे ॥२४९॥
हे शुद्ध ही अशुद्धता । असा भेद न जाणता । जसे बालक येईल ते हाता । घालते मुखी ॥२५०॥
पापपुण्याचं बा खिचडं । खाण्याची तया आवड । चांगल्या वाईटाची भिडभाड । नाही तया ॥२५१॥
यालाच म्हणती अज्ञान । केले सहाही दोषांचे विवरण । न ठेवता शंकेला स्थान । मुळीच अर्जुना ॥२५२॥
या दोषाच्या बा कारण । आसुरी संपत्ती बळावणं । जसे घातक नागाचं असणं । विषाच्याकारण ॥२५३॥
अग्नी एकत्र येता तीन । जगास टाकती जाळून । येथे तर सहा जण । जमले अर्जुना ॥२५४॥
एकत्र येता त्रिदोषानं । न चुकते बा मरण । मग ब्रह्मदेवाही शरण जाणं । व्यर्थ अर्जुना ॥२५५॥
ऐशा सहा दोषांनी । झाली आसुरीची उभारणी । या सहांची मेळणी । घातक अर्जुना ॥२५६॥
जसे ते क्रूर ग्रह येतात । अर्जुना एकाच बा राशीत । तैसी सर्व पापे जमतात । निंदकापाशी ॥२५७॥
येता ते अर्जुना मरण । सर्व रोग करती आक्रमण । जसे दुष्ट योग येती जुळून । अशुभ दिवशी ॥२५८॥
चोर न करतो कल्याण । कधी सुख का दिलं महापुरानं । तैसे या दोषाकारण । अकल्याण अर्जुना ॥२५९॥
जेव्हा शेळीचे आयुष्य संपते । सात नांग्यांची इंगळी डसते । तैसे जमती सहाही दोष ते । पाप्याठायी ॥२६०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मोक्षाकडे बा जाताना । जर पाळले या सहा जणांना । मग प्राप्त होणे ज्ञाना । अशक्यच की ॥२६१॥
मग हीन योनीत जन्मत । नरकाच्या पायऱ्या उतरत । स्थावरच्या ही खाली असे जात । जीव अर्जुना ॥२६२॥
जयांच्या ठायी आसुरी गुण । तयांचे होते अकल्याण । आसुरी गुणांचं वाढणं । दुर्दैव अर्जुना ॥२६३॥
ऐशा या संपत्ती दोन । दाखविल्या स्पष्ट करून । आणि तयांची ती लक्षणं । ऐकलीस तू ॥२६४॥
या दोघातली पहिली । दैवी जी म्हणितली । ती मोक्षाचीच बा सावली । अर्जुना माझ्या ॥२६५॥
अन्य जी दुसरी । संपत्ती बा आसुरी । जीवास ती जखडणारी । बेडीच अर्जुना ॥२६६॥
हे सारे बा ऐकून । जाशील अर्जुना घाबरून । तुझ्या अंगी आसुरीगुण । नाहीच बा अर्जुना ॥२६७॥
जयांच्या बा ठिकाणी । या दोषांची रहाटणी । तेच पहा बंधनी । पडले अर्जुना ॥२६८॥
पण जन्मला असे अर्जुन । घेऊन बा दैवीगुण । दैवी गुणांची खाण । अर्जुना तू ॥२६९॥
तुझ्यातले दैवी गुण । अर्जुना तू वाढवून । मोक्ष तो प्राप्त करणं । कर्तव्य तुझे ॥२७०॥
दैवासुर संपत्तीचा प्रकार । अनादिच जो व्यवहार । जाहला तो साकार । कर्मांच्या कारणे ॥२७१॥
रात्री निशाचरांचा व्यापार । दिवसा मनुष्याचा व्यवहार । तैसे दैवी आणि आसुर । गुण अर्जुना ॥२७२॥
आपल्याच कर्मांच्या कारण । वर्तती बा हे गुण दोन । दैवी आणि आसुरी म्हणून । अर्जुना येथे ॥२७३॥
दैवीगुण ते विस्तारून । आधीच केले मी कथन । आता आसुरीचे वर्णन । ऐकावे अर्जुना ॥२७४॥
बा आसुरी ती गोष्ट । मी सांगणार आहे थेट । पण तू अवधाना पाट । बांधावा अर्जुना ॥२७५॥
जसा त्या वाद्यावाचून । नाद का होतो निर्माण । वा कधी का फुलांवाचून । प्रकटते मध ॥२७६॥
अर्जुना हे आसुरी गुण । न राहती शरीरावाचून । शरीरातच बा प्रकटन । तयांचे अर्जुना ॥२७७॥
सापडता देह कचाट्यात । तयावर सत्ता असे गाजवत । जसा अग्नी असे व्यापत । लाकडा अर्जुना ॥२७८॥
उसाची वाढ होणे । अर्जुना ते रसाचेच वाढणे । तैसे देहाचे जे असणे । ते गुण अर्जुना ॥२७९॥
अर्जुना या दोषांनी । प्राणी जे बांधले बंधनी । तयांची ती उजळणी । करू आता ॥२८०॥
पुण्य ते करणे । पाप ते सोडणे । ऐसा विचारच नसणे । तयांच्या मनी ॥२८१॥
कीडा कोषात पडता अडकून । नसेच बाहेर पडण्याची जाण । तैसे बंधनातच राहणं । तयांचं अर्जुना ॥२८२॥
सारासार विचार नसणे । चोरांच्या हाती धन देणे । ऐसेच तयांचे वागणे । अर्जुना माझ्या ॥२८३॥
तैसे प्रवृत्ती निवृत्ती दोन्ही । जाणतीच ना ते अज्ञानी । नसे शुद्धता तयांच्या मनी । स्वप्नातही अर्जुना ॥२८४॥
कोळसा काळेपण सोडेल । कावळाही सफेद होईल । आणि मांसास त्या विटतील । राक्षस अर्जुना ॥२८५॥
पण अर्जुना हे असुर । शुद्धता नाही जाणणार । भांडे पवित्र कैसे होणार । मद्याचे अर्जुना ॥२८६॥
शास्त्रानुसार ते वागणे । सज्जनांचे अनुकरण करणे । शुद्धता ती आचरणे । ठाऊक ना तया ॥२८७॥
ते चरणे जसे शेळीचे । का धावणे वाऱ्याचे । जसे जाळणे आगीचे । अचाटच अर्जुना ॥२८८॥
तैसे वागती बा स्वैर । अज्ञानी ते असुर । सत्यासी तयांचे वैर । अर्जुना सदा ॥२८९॥
विंचू जर नांगीनं । अर्जुना गुदगुल्या करीन । तैसे सत्य वागणं । आसुरांनी अर्जुना ॥२९०॥
जसं अशक्य अपान वायूनं । सुगंध होऊन प्रकटणं । तसं शुद्ध ते वर्तन । अशक्य असुरा ॥२९१॥
जरी असे काही न करती । तरी स्वभावत:च दुष्ट असती । तयांच्या त्या गोष्टी । ऐकाव्या आता ॥२९२॥
तू जाणतोस ना उंटाला । तेथे कोणता अवयव चांगला । प्रकार तैसाच त्यातला । असूर असती ॥२९३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे त्या धुरांड्यातून । केवळ धूरच बाहेर येणं । तैसे अशुद्ध बोलणं । तयांचे सदा ॥२९४॥
विश्व अनादि असून । तयाचे ईश्वराद्वारे नियमन । ठेवलं आहे सांगून । ज्ञान्यांनी अर्जुना ॥२९५॥
ज्ञानास जो न माने । तया नशिबी नरकीच जाणे । ज्ञानावर विश्वास ठेवणे । स्वर्ग अर्जुना ॥२९६॥
ऐसी ही विश्वव्यवस्था । अनादि जी पार्था । असुर तया म्हणती वृथा । अवघेचि हे ॥२९७॥
यज्ञ करती मूढ जन । अज्ञान ते देवपूजन । गेले योगी नागावून । समाधिभ्रमे ॥२९८॥
जे जे येईल हातात । ते भोगावे मनसोक्त । त्याहून वेगळे पुण्यकृत्य । न ठाऊक तयां ॥२९९॥
अंगीच्या अशक्तपणा कारण । भोग न घेऊ शकती सज्जन । विषयसुख न भेटणं । तेचि पाप ॥३००॥
प्राण घेणे श्रीमंतांचे । हे जरी पापचि बा साचे । प्राप्त होणे तयांच्या संपत्तीचे । मानती ते पुण्य ॥३०१॥
मोठ्या माशानं लहानास खाणं । हेच सृष्टीचे नियमन । का न होती ते नि:संतान । करता पाप ॥३०२॥
कुळगोत ते पाहून । मुलामुलींचं लग्न करणं । ते प्रजोत्पत्तीच्याच हेतूनं । मानणे त्यांचे ॥३०३॥
पशुपक्ष्यादि त्या जाती । तया अगणित संतती । कोणती नैतिकता पाळती । प्राणी सारे ॥३०४॥
जैसे चोरीचे द्रव्य ते । कोणास का विष होते । आणि करता परदारागमन ते । का होतसे कुष्ठ ॥३०५॥
देवाचे ते असणे । आणि कर्मसिद्धांत मानणे । स्वर्ग नरकाचे ते नांदणे । तयासी असत्य ॥३०६॥
स्वर्ग नाही दिसत । आणि देव नाही आढळत । कर्माचे ते अस्तित्व । न मान्य तयांना ॥३०७॥
जसे उर्वशीच्या सहवासात । इंद्र सुख असे भोगत । तसे कीडेही त्या घाणीत । सुखी अर्जुना ॥३०८॥
स्वर्ग नरक भेटे पुण्य पापाने । हे योग्य नाही म्हणणे । कामवासनाच ती भोगणे । दोन्ही ठिकाणी ॥३०९॥
स्त्री-पुरुषांचं एकत्र येणं । ते कामाच्याच कारण । आणि जग होतसे उत्पन्न । कामाच्याच ठायी ॥३१०॥
जे जे सुख वाटणं । ते भोगले जाते कामाकडून । आणि जगी करून द्वेष निर्माण । कामचि नाशी ॥३११॥
एवं कामावाचून काही । जगा मूळचि आन नाही । ऐसे बोलती पाही । असूर गा ते ॥३१२॥
नकोच बा ते बोलणे । तयांचा विचार करणे । निष्फळचि बा असणे । चर्चा तयांची ॥३१३॥
ईश्वराच्या द्वेषाकारण । तयांनी नुसतंच बडबडणं । आणि अज्ञानच असणं । तयांच्या चित्ती ॥३१४॥
नास्तिक ते होऊन । दुष्कर्म बा आचरून । भ्रमातच ते रहाणं । जीवन त्यांचे ॥३१५॥
स्वर्गाविषयी बा आदर । का नर्काविषयी डर । दोहोंचाही तो अंकुर । नाहीच तेथे ॥३१६॥
ऐसे देहात बा अडकून । इंद्रियात जाती ते फसून । विषय चिखलात लोळणं । आढळे तेथे ॥३१७॥
जाता पाणी आटून । माशांना येता मरण । मग कोळ्यांनी तेथे जमणं । तैसे अर्जुना ॥३१८॥
विश्वाचा नाश करण्या । धूमकेतू येतो उदया । तैसे लोकांना त्रास देण्या । जन्मती असूर ॥३१९॥
दुष्टपणाचे बीज रुजणे । आणि तया कोंभ फुटणे । तैसेच पापाचे हे नमुने । चालतेबोलते ॥३२०॥
जसं त्या आगीनं । सर्वांनाच बा जाळणं । तैसे सर्वांना दु:ख देणं । स्वभाव यांचा ॥३२१॥
अज्ञानाच्या त्या कारण । भ्रमात त्यांचं जगणं । कैसे तयांचे ते जीवन । ऐक आता ॥३२२॥
नाही जाळे पाण्याने भरत । आणि आगीस इंधन नाही पुरत । तसे काम दुर्भरांच्या पंक्तीत । प्रथम अर्जुना ॥३२३॥
त्या कामाचा ओलावा । जीवी धरून पांडवा । दंभमानाचा मेळावा । मेळविती ते ॥३२४॥
हत्तीला माज येणं । आणि तशात दारू पाजणं । ऐसे बा माजोरीपणं । तयांच्या अंगी ॥३२५॥
आधीच दुराग्रही असणं । तशात ते मूर्खपण । मग तयांचे ते हट्टीपण । सांगावे काय ॥३२६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

दुसऱ्यांस पीडा देणे । जीव तयांचा घेणे । हेच तया बा आवडणे । अर्जुना माझ्या ॥३२७॥
आपला पराक्रम सांगती । जगाला तुच्छ लेखती । ऐसे दाही दिशा फैलाविती । वासनांचे जाळे ॥३२८॥
जैसे मोकाट त्या सांडाने । गावभर धुमाकूळ घालणे । तैसेच असुरांचे वागणे । आहे अर्जुना ॥३२९॥
ऐसी कामना तयांच्या मनी ती । ते सदैव कामनाच चिंतती । आणि कामनेतच मरती । असुर सारे ॥३३०॥
कामना खोल पाताळाहून । नि असे उंच त्या गगनाहून । विश्व परमाणु भासणं । कामनेपुढे ॥३३१॥
ऐसे भोग ते वाढवून । तयांनी चिंतानीच जाणे घेरून । मग येताही मरण । सोडेना चिंता ॥३३२॥
तैसी चिंता अपार । वाढवून बा निरंतर । भोगणे भोग असार । जीवन त्यांचे ॥३३३॥
स्त्रियांचे गाणे ऐकावे । सौंदर्य डोळ्यांनी पहावे । तयांना आलिंगन द्यावे । कामना त्यांची ॥३३४॥
म्हणे तयांचे मन । नसे स्त्रियांसारखे सुख अन्य । अमृतही टाकती ओवाळून । स्त्रियांवरून अर्जुना ॥३३५॥
ऐसे स्त्रीभोगाच्या मागे लागून । स्वर्ग पाताळही धुंडाळणं । सतत अतृप्त असणं । जीवन त्यांचे ॥३३६॥
माशाने अमिषाच्या आशेने । गळाचा विचार न करणे । तैसी विषयाठायी असणे । आसक्ती त्यांची ॥३३७॥
इच्छा होता त्या पूर्ण । नवीन इच्छांचं वाढणं । मग इच्छातच जाती अडकून । जसे कोष किडे ॥३३८॥
इच्छा राहता अपूर्ण । तेथे क्रोध द्वेषाचं जन्मणं । ऐसे कामक्रोधाकारण । अडकती असुर ॥३३९॥
जसे त्या चौकीदाराने । रात्रंदिवस कर्तव्य करणे । तैसे कामक्रोधात व्यस्त राहणे । नशीब यांचे ॥३४०॥
कामाकारण आसक्त होणे । क्रोधाकारण द्वेष करणे । ऐसे रागद्वेषात रहाटणे । चालते तेथे ॥३४१॥
मनाच्या हावरटपणाकारण । विषयांच्या नादी लागणं । मग धन ते कमावणं । अनिवार्य की ॥३४२॥
म्हणून विषयभोगाच्या इच्छेनं । गोळा करती ते धन । लूटमार ती करणं । स्वभाव त्यांचा ॥३४३॥
कोणासही फसवून । कोणासही लुटून । आपली तिजोरी भरणं । ठाऊक त्यांना ॥३४४॥
निघे पारधी जसे शिकारीला । सोबत घेऊन जाळे व कुत्र्याला । तैसी मदत याला । कुबुद्धीची अर्जुना ॥३४५॥
जसे प्राण्यांना मारून । पारध्याने पोट भरणं । तैसे इतरांचे गळे चिरून । हे कमावती धन ॥३४६॥
ऐसे घातपात करून । धन ते कमावणं । आणि मग संतोषून । म्हणती ते ॥३४७॥
म्हणे खूप सारे धन । मी घेतले कमवून । म्हणून स्वत:स धन्य । मानणे त्यांनी ॥३४८॥
ऐसे स्वत:स धन्य मानून । भरकटे तयांचे मन । म्हणे अजून कमावणे धन । गरजेचे आहे ॥३४९॥
मी इतके धन जोडीन । की जगास विकत घेईन । ऐसीच इच्छा असणं । मनी त्यांच्या ॥३५०॥
ऐसे धन कमावून । मी विश्वाचा स्वामी होईन । जो आडवा मला येईन । संपवीन त्याला ॥३५१॥
मारले मी वैरी थोडे । आणिकही मारीन तेवढे । मग माझ्या कीर्तीचे चौघडे । वाजतील सर्वत्र ॥३५२॥
जे माझे गुलाम होतील । तयांनाच मी वाचवील । जसा ईश्वरच मी होईल । चराचराचा ॥३५३॥
माझ्या भोगभूमीचा गवगवा । स्वर्गापर्यंत तो जावा । मग इंद्रासही हेवा । वाटेल माझा ॥३५४॥
करीन मने वाचा देहे । तैसे बा होणेच आहे । मजवाचुनी दुसरा नोहे । समर्थ कोणी ॥३५५॥
यम जरी समोर आला । जिंकून घेईन मी त्याला । इतका असे ताठावला । असुर अर्जुना ॥३५६॥
आहे कुबेर संपन्न । पण नाही माझ्या बरोबरीनं । नसे मज ऐवढे धन । त्रिभुवनात कोठे ॥३५७॥
माझ्या कुळाचे ते थोरपण । आणि पितरांचे ते गुण । ब्रह्मदेवही क्षुल्लक असणं । तयाच्या पुढे ॥३५८॥
जयाला बा ईश्वर म्हणतात । तो खुजाच असे बा भासत । तैसी माझी सर नसे येत ।कोणालाही ॥३५९॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आता जे लोपले जारणमारण। तयांचा उद्धार मी करीन। ऐसे अघोरी यज्ञ करणं। आवडे त्याला ॥३६०॥
जे जे गाऊन आणि नाचून। रिझवतील माझे मन। तयांना मी देईन। मागतील जे ॥३६१॥
दारू मांस सेवून। स्त्रियांना देईन आलिंगन। ऐसा आनंद भोगीन। अखंड मी ॥३६२॥
अजून काय करू वर्णन। त्या असुरी गुणांकारण। बा आकाशपुष्पा हुंगणं। तयांनी जसे ॥३६३॥
जसा तापाच्या त्या भरात। रोगी असे चावळत। तसेच कामनांच्या लहरीत। बडबड त्यांची ॥३६४॥
अंतरीच्या अज्ञानाकारण। चांगले वाईट न समजल्यानं।कामनांच्या नरकात अडकणं। घडे त्यांचं ॥३६५॥
आषाढात मेघ अगणित। सागरी लाटा त्या अनंत। तसा कामनांना नसे अंत। मनी यांच्या ॥३६६॥
जसे त्या काट्यांनी। कमळे फाडावी ओरबडूनी। तैसे त्रस्त हे चिंतांनी। सदैव अर्जुना ॥३६७॥
दगडावर त्या आपटून। जसं मडक्यानं फुटणं। तैसे हे सदैव छिन्नभिन्न। कामनांच्या कारण ॥३६८॥
जशी रात्र असे वाढत। अंधार अधिकच असे दाटत। तैसे असुरांच्या अंत:करणात। वाढतो मोह ॥३६९॥
मोहाची होता वाढ। विषयांची वाढते आवड। ऐसे पातकांचे ते झाड। वाढते अर्जुना ॥३७०॥
वासनांचे लाड करून। पातके जाती बळावून। मग तयांनी नरक अनुभवणं। जिवंतपणी ॥३७१॥
ऐसे बा अर्जुना। जे गोंजारती कामनांना। ते नरकाच्या स्थाना। वस्तीस जाती ॥३७२॥
जेथे झाडाची पाने तलवार। रखरखीत निखाऱ्यांचे डोंगर। आणि तप्त तेलाचे सागर। असती अर्जुना ॥३७३॥
जेथे अनेक यातनांचे प्रकार। दररोज नवा छळ भयंकर। ऐशा नरकात असुर। पडती अर्जुना ॥३७४॥
ऐसे नरकांत जे जन्मले। तयांनी दु:खच बा भोगले। मग तेथेही करू लागले। ते यज्ञ अर्जुना ॥३७५॥
एऱ्हवी अर्जुना यज्ञ करणं। ते करतसे कल्याण। पण असुरांच्या आचरणाकारण। व्यर्थ ते ॥३७६॥
जसं बा त्या वेश्येनं। एखाद्याच्या घरी घुसून। सात्त्विकतेचं नाटक करणं। तैसेच हे ॥३७७॥
तैसे आपल्या आपण। मोठे बा मानून। गर्वानं फुगून जाणं। असुरांनी अर्जुना ॥३७८॥
जसे त्या लोखंडाच्या खांबानं। कधीच न बा लवणं। तैसे असुरांनी ताठणं। सदैव अर्जुना ॥३७९॥
आपल्या चांगुलपणाचे कौतुक। तयांना वाटतं इतकं। मग मानती गवताहून क्षुल्लक। जगाला अर्जुना ॥३८०॥
धनसंपत्तीच्या कारण। अर्जुना तयांनी माजणं। चांगलं वाईट ओळखणं। न ठाऊक तया ॥३८१॥
जया अंगी ऐसे गुण। मग तेथे सत्य यज्ञ कुठून। ते आसूर बा काय करतीन। नेम नाही ॥३८२॥
जेव्हा तयांच्या मनात येतं। ते यज्ञही बा करतात। पण नुसतं सोंगच असतं। अर्जुना तेथे ॥३८३॥
ना कुंड ना मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धि। आणि तयांचे ते विधी। द्वैत अर्जुना ॥३८४॥
ते देव आणि ब्राह्मण। तयांना होतच नाही सहन। मग तयांच्या यज्ञाला कोण। येईल अर्जुना ॥३८५॥
मेलेले वासरू पेंढा भरून। गायीच्या त्या पुढे ठेवून। जसं दूध ते काढणं। तैसे अर्जुना ॥३८६॥
तैसे यज्ञाच्या निमित्तानं। लोकांना आमंत्रणे देऊन। आणि आहेर ते उपटणं। हेतू त्यांचा ॥३८७॥
ऐसे लोभाच्या कारण। अर्जुना यज्ञ करणं। मग सर्वनाशच होणं। वाढता कामना ॥३८८॥
वाजंत्री ती लावून। आम्ही दीक्षित झालो सांगणं। ऐसे वायफळ ते बडबडणं। तयांनी सदैव ॥३८९॥
अधमपणाच्या कारण। ते गर्विष्ठ जाती होऊन। जशी पुटं अंधाराला चढणं। काजळाची अर्जुना ॥३९०॥
ऐसा मूर्खपणा वाढून। जाती उद्धट ते होऊन। मग अहंकार दुप्पट होऊन। अविवेकी होती ॥३९१॥
मग सर्वांना क्षुल्लक मानून। स्वैर तयांचं वागणं। आणि मग अज्ञान वाढणं। अधिकच अर्जुना ॥३९२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मग जेव्हा असं होतं । तेव्हा कामाचंही पित्त खवळतं । आणि क्रोधाग्नी असे भडकत । अंतरी अर्जुना ॥३९४॥
जशी त्या भर उन्हाळ्यात । वखारीस आग असे लागत । आणि वाराही सुटे जोरात । तैसे अर्जुना ॥३९५॥
तैसे अहंकार तो वाढता । कामक्रोधात गुरफटता । या दोघांचा संयोग घडता । घडतो अनर्थ ॥३९६॥
ऐसे बेभान होऊन । दुसऱ्यांची हिंसा करून । स्वैर ते वागणं । स्वभाव त्यांचा ॥३९७॥
मग यापुढे जाऊन । आपल्याच त्या रक्तमांसानं । करती ते होमहवन । बेभानपणे ॥३९८॥
ज्या देहात मी असे रहात । तया जाळती ते जिवंत । ऐसे मलाही छळतात । असूर सारे ॥३९९॥
जारणमारण ते करून । जयांना यांनी त्रास देणं । त्यांच्यात मीच असल्याकारण । त्रास मजला ॥४००॥
या सर्व उपद्रवातून । जे वाचले दैवयोगानं । तयांची बा निंदा करून । छळती तयांना ॥४०१॥
पतिव्रता आणि सत्पुरूष । दानी आणि याज्ञिक । जे तपस्वी अलौकिक । नावडती तया ॥४०२॥
महात्मे आणि भक्तजन । जया माझी आठवण । करती जे होमहवन । वेदानुसार ॥४०३॥
तयांचा द्वेष भयंकर । करती हे असुर । करून शब्द बाणांचे प्रहार । हाणती तयां ॥४०४॥
ऐशा या रीतीने । माझ्याशी वैर मांडणे । तया काय पडे भोगणे । ऐक आता ॥४०५॥
मनुष्य देहात जन्मून । जे वागती असूर होऊन । तया हीन योनीत घालणं । कर्तव्य माझे ॥४०६॥
जेथे क्लेशरुपी घाण । आणि दु:खाचंच रहाटणं । त्या तमोयोनीत जन्म । देतो तयांना ॥४०७॥
जेथे गवतही नाही उगवत । अशा ओसाड त्या रानात । विंचू वाघ असे बनवत । तयांना मी ॥४०८॥
मग भुकेने ते कातावून । आपलेच लचके तोडून । पुन्हा पुन्हा मरून । जन्मती तेथे ॥४०९॥
अंतरीच्या विषाकारण । जयांची लाही लाही होणं । ऐसा सापाचा जन्म । मिळतसे तया ॥४१०॥
श्वास जो आत आला । नि पुन्हा बाहेर गेला । तितका विसावाही दुर्जनाला । न मिळे अर्जुना ॥४११॥
ऐशा त्या अगणित । करोडो कल्पापर्यंत । ठेवत असे क्लेशात । अर्जुना तया ॥४१२॥
पुढच्या टप्प्यात तयांना । भोगावे लागते ज्या दु:खांना । तयांची करता बा तुलना । हे काहीच नाही ॥४१३॥
आसुरी त्या गुणांकारण । तयांना दु:ख पडे भोगणं । तयांच्या दु:खाचं कारण । स्वभाव त्यांचा ॥४१४॥
अर्जुना बा त्यानंतर । जो व्याघ्रादिकांचा प्रकार । त्या देहाचाही आधार । न मिळे तया ॥४१५॥
घेता तयांचा आधार हिरावून । ते तमच जाती बनून । काळोखही जाई काळवंडून । तया स्पर्शता ॥४१६॥
किळस पापाही असे वाटत । धास्ती नरक तयांची घेतात । दु:खालाही मूर्च्छा असे येत । स्पर्शाने त्यांच्या ॥४१७॥
मलही होतसे मलिन । अग्नीही जातसे पोळून । भयाचा थरकाप होणं । तयांचे कारणे ॥४१८॥
पापासही तयांचा कंटाळा । अमंगळ जे अमंगळा । विटाळ तयांचा विटाळा । वाटतो अर्जुना ॥४१९॥
ऐसे हे असून हीन । तया तामस योनीत जन्मून । पुढे पडे तमच बनणं । प्रत्यक्ष अर्जुना ॥४२०॥
सांगताना वाचा थरथरते । आठवता मन दचकते । मूर्खांनी केले केवढे ते । पाप अर्जुना ॥४२१॥
एवढी भयंकर अधोगति । घडवते असुरी संपत्ती । तरी असुर तिला पोसती । समजेच ना मजला ॥४२२॥
अर्जुना तू म्हणून । टाळ त्या वाटेनं जाणं । जिकडे हे असुरी गुण । राहती अर्जुना ॥४२३॥
आणि दंभादि दोष साही । हे असतील जयांचे ठायी । तयांचा तो संपर्कही । न यावा अर्जुना ॥४२४॥
कामी क्रोधी लोभी मन । तीच दु:खाची खाण । दुर्दैवाचं ते रहाणं । तेथे अर्जुना ॥४२५॥
दलाल हे तीन । दु:खाने ठेवले नेमून । या तिघांच्याच कारण । अति दु:ख अर्जुना ॥४२६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

करता कामक्रोधाची नेमणूक । वाढती अर्जुना पातक । ऐसे भोगवी बा नरक । दु:ख अर्जुना ॥४२७॥
जोवर हे न उठती अंतरात । तोवर नरक केवळ पुस्तकात । आणि प्रकटता मनात । प्रकटे नरक ॥४२८॥
हे दोष संचारता मनी । अपाय तत्काळ जातो होऊनी । जगी म्हणती बा हानी । ती हीच ॥४२९॥
अजून काय सांगू अर्जुना । याच भयंकर नरक यातना । म्हणून बा तयांना । ठेवावे दूर ॥४३०॥
कामक्रोधात जो असे अडकत । तो नरकातच असे जात । आणि पडे तेथे खितपत । जन्म कोटी ॥४३१॥
म्हणून तुला अर्जुना । सांगतो मी पुन: पुन्हा । या कामक्रोध लोभांना । लोटावे दूर ॥४३२॥
कामक्रोधांचा तो वात । जयाने सांडला मूळात । तयानेच मोक्षाची बात । करावी अर्जुना ॥४३३॥
हे दोष अर्जुना तीन । जोवरी जीवाठायी असणं । तोवरी जीवाचे कल्याण । होईल कैसे ॥४३४॥
हवे असेल जीवाचे कल्याण । मग रहावं तिघास घाबरून । सदैव सावध राहून । साधावे ज्ञान ॥४३५॥
पोटाशी दगड बांधून । समुद्र जाणे पोहून । वा विषावर ताव मारणं । भुकेखातर ॥४३६॥
कामक्रोधास अंगीकारून । सुखी होण्याचा प्रयत्न करणं । ते अर्जुना जाण । तैसे आहे ॥४३७॥
जेव्हा ही त्रिपुटी संपते । तेव्हाच आत्महित प्रकटते । मग आपलीच भेट होते । आपल्याशी ॥४३८॥
त्रिदोष संपता शरीरी । त्रिदाह निमालिया अंतरी । मग आत्मयाची नगरी । अनुभवते सुख ॥४३९॥
तैसे कामक्रोध लोभ सुटणे । मगच जीव तृप्त होणे । जे घडे सत्संगाकारणे । अर्जुना माझ्या ॥४४०॥
अर्जुना त्या सत्संगाकारण । आत्मशुद्धीचा मार्ग उमजून । जन्म-मृत्यूच्या कचाटयातून । सुटतो जीव ॥४४१॥
आत्मज्ञान होता । स्मरते आपली स्वरूपता । जीवभावाचा गुंता । विरुन जाई ॥४४२॥
स्वत:च आत्मतत्त्व होऊन । द्वैतभाव खुंटून । विश्वाचं ते भासणं । संपून जाई ॥४४३॥
ऐसे कामक्रोध विरता । ज्ञान होते पांडुसुता । मग विश्वाची ती सत्ता । अंतराठायी ॥४४४॥
मुक्ती न आवडल्याकारण । जयांनी कामक्रोधी रममाण होणं । मग तया स्वरूपाचं ज्ञान । होत नाही ॥४४५॥
उपदेश संतांनी जे केले । तया ज्या जीवांनी डावलले । तयांनी अहितच केले । स्वत:चे अर्जुना ॥४४६॥
न धरणे विधिनिषेधाची भीड । करणे इंद्रियांचे लाड । मग ज्ञानावर झापड । येते अर्जुना ॥४४७॥
कामनेच्यामागे लागून । स्वैरपणे ते वागून । करती आपलेच अकल्याण । अज्ञानपणे ॥४४८॥
तयांना मुक्तीची ती कथा । नाहीच माहीत सर्वथा । आणि कामक्रोधाची व्यथा । सोडीच ना ॥४४९॥
मग अलौकिक ते लोपणे । आणि लौकिकही दूर जाणे । ऐसे ते अज्ञानाकारणे । नागवले जाती ॥४५०॥
त्या इंद्रियांना बा भुलून । मग आत्मतत्त्वा विसरणं । आणि नरकात ते जाणं । अज्ञानाकारण ॥४५१॥
ऐसे विषयांच्या नादी लागून । होते तयांचे अकल्याण । आणि दु:खात तयांना मरण । येते अर्जुना ॥४५२॥
स्वर्गसुख दूर जाते । आणि लौकिकही न लाभते । मग मोक्षाची गोष्ट ते । जाणतीच ना ॥४५३॥
ऐसे कामनांच्याकारण । विषयांच्या मागे धावणं । मग लौकिक अलौकिक अंतरून । मोक्षही अंतरे ॥४५४॥
जर जीवा ऐसे वाटणं । व्हावे आपले कल्याण । मग संतांचे ते वचन । आचरावे जीवनी ॥४५५॥
जैशी पतीचिया मता । अनुसरून ती पतिव्रता । अनायासे आत्महिता । होतसे प्राप्त ॥४५६॥
श्रीगुरूंच्या त्या वचना । देता मिठी अर्जुना । शिष्य ती आत्मभावना । अनुभवे अंतरी ॥४५७॥
जसे अंधारातला ठेवा । वाटे जर परत लाभावा । मग उजेडास्तव दिवा । लावणेच आहे ॥४५८॥
तैसे होण्या ते आत्मज्ञान । संतांना जावे शरण । तरच स्वरूपाचे भान । अंतरी प्रकटे ॥४५९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जे योग्य म्हणे जीव । ते सर्व अर्जुना त्यागावं । केवळ संतांचच ऐकावं । आत्मकल्याणा ॥४६०॥
अर्जुना आकळता संतवचन । दूर नाही आत्मज्ञान । आत्मतत्त्वाचं प्रकटन । संतांचे संगती ॥४६१॥
ते अहितापासून काढिती । हित देऊन वाढविती । नाही गा संतापरौती । माऊली जगा ॥४६२॥
संतांच्या या कारण । ब्रह्मी एकरूप होणं । म्हणून संतांपासून दूर जाणं । न घडो अर्जुना ॥४६३॥
पूर्वपुण्याच्या कारण । अर्जुना तू येथे जन्मणं । म्हणून श्रीगुरूंचे वचन । ऐकलेस तू ॥४६४॥
धर्माचा तू बंधू लहान । म्हणून लाभले संतवचन । करून धर्मानुरूप वर्तन । मिळवावा मोक्ष ॥४६५॥
चांगले वाईट जाणून । कर्मी रहावे सावधान । अयोग्य ते टाळणं । कर्तव्य तुझे ॥४६६॥
आपले कर्तव्य ओळखून । करावे अर्जुना आचरण । निष्काम कर्म करणं । रहस्य आहे ॥४६७॥
अर्जुना होऊन सावधान । पाळावे संतांचे वचन । मोहाच्या नादी लागणं । चांगलं नाही ॥४६८॥
ऐसी असुर लक्षण । सांगितली भगवंतानं । भगवंताचं ते निरूपण । ऐकले तुम्ही ॥४६९॥
आता पुत्र तो पांडूचा । विचारेल प्रश्न मनीचा । कान करुन जीवाचा । ऐकावा तुम्ही ॥४७०॥
व्यासांच्या कृपेनं । जे सांगितलं संजयानं । करील तो प्रसंग कथन । श्रीगुरूंच्या कृपेने ॥४७१॥
तुम्ही सर्व संतांनी जर । कृपा केली माझ्यावर । तर माझाही उद्धार । होईल येथे ॥४७२॥
जो स्वत:कडे पाहीन । तो मुक्त या होईन । हे आहे वचन । ज्ञानदेवाचे ॥४७३॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगोनाम षोडशोऽध्याय: ॥१६॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

---

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य  
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर  
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,  
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान ®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०